क्र./पोईएन / सोआर /अ-३/९५ १२५
पुणे, दिनांक :- .९.१९९५

22 SEP 1995

उपसंचालक, भूमि अभिलेख,
पुणे / मुंबई / नाशिक /औरंगाबाद / अमरावती / नागपूर. [नांवाने].

CR1995092201

विषय :- विलंबाने प्रदान करण्यात आलेल्या निवृत्ती वेतन / उपदानाच्या रकमेवर व्याज देणे बाबत...

विलंबाने प्रदान करण्यात आलेल्या निवृत्ती वेतन / उपदानाच्या रकमांवर व्याज देणे बाबत शासनाने आदेश दिलेले असून सदर आदेशांचा महाराष्ट्र नागरी सेवा [निवृत्ती वेतन] नियम, १९८२ मध्ये नियम १२९ ए व १२९ बी या नियमात समावेश करण्यात आलेला आहे. तसेच शासनाने वेळोवेळी आवश्यक ती स्पष्टीकरणे सुध्दा दिलेली आहेत. शासनाकडून प्राप्त झालेले आदेश दि. २३.६.८६, १४.५.८७, ६.५.९१ व दि. २४.४.९५ च्या प्रती या सोबत पाठविणेत येत आहेत. त्याचे अवलोकन करावे व प्रत्येक प्रकरणी नियमानुसार कार्यवाही केली जाईल याकडे विशेष लक्ष पुरवावे. प्रत्येक प्रकरणी नियमानुसार व वेळेवर कार्यवाही झाल्यास व्याज मंजूरीसाठी शासनाकडे जावे लागणार नाही. तरी तशा कार्यवाहीची अपेक्षा आहे.

File to Circulars File

जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख [म.राज्य] पुणे यांचेकरिता.

प्रत :- कार्यालय अधिक्षक, [ई-२] / [ई-३] / [ई-५] [ई-४] जमाबंदी आयुक्त, पुणे कार्यालय यांचेकडे आवश्यक कार्यवाहीस्तव. [सर्व शासन आदेशासह].

प्रत :- अभिलेखापाल, जमाबंदी आयुक्त, पुणे यांचेकडे सर्व शासन आदेशांच्या प्रतीसह आवश्यक कार्यवाहीस्तव.

केएस.